# परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे तेजस्वी विचार

## अनुक्रमणिका


**प्रकरण १. हिंदु समाजाच्या संदभातील विचार १०**

१. हिंदु धर्मियांना दिशादर्शन १०
२. हिंदु धर्मियांच्या अयोग्य विचारांचे खंडन १५
* सर्वधर्मसमभाव * जात्यधंता * बुद्धीप्रामाण्यवाद १५
३. हिंदु संघटनांना कर्तव्यपालनाच्या संदर्भात मार्गदर्शन १९

**प्रकरण २. राष्ट्राच्या संदर्भातील विचार २१**
१. पर्यावरण आणि प्रदूषण २१
२. शिक्षण २३
३. स्वभाषाभिमान २४
* पालकांनो, पाल्यांना मातभृाषेत शिकवा ! २५
४. आरक्षण (राखीव जागा) २६
५. भ्रष्टाचार २७
६. नक्षलवाद २८
७. आतंकवाद २९
८. पोलीसयंत्रणा ३०
९. प्रशासन ३२
१०. न्यायव्यवस्था, प्रचलित कायदे, न्यायाधीश आणि अधिवक्ते ३३
११. प्रसारमाध्यमे आणि पत्रकारिता ३६
१२. राजकारणी ३७
१३. राजकीय पक्ष ३८
१४. लोकशाही ३८
* देशाला रसातळाला नेणाऱ्या हास्यास्पद लोकशाहीचे मर्म ! ३९
* प्रजा सत्त्वप्रधान असली, तरच लोकशाही यशस्वी होते ! ४०
१५. हिंदु राष्ट्र ४१
* हिंदु राष्ट्राच्या स्थापनेची आवश्यकता ! ४१

* हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे वेळापत्रक ४२
* हिंदु राष्ट्राची स्थापना करण्यासाठी आवश्यक असलेले बळ ४२

**प्रकरण ३. हिंदु धर्माच्या संदर्भातील विचार ४४**
१. हिंदु धर्माचे महत्त्व ४४
* केवळ हिंदु धर्म अनादी असल्यामुळे त्याचा अंत होणार नाही ! ४५
२. हिंदु मानबिंदूंचे रक्षण ४६
* गोरक्षणाच्या कायार्चे महत्त्व आणि मर्यादा ४६
* आध्यात्मिक लाभ देणारी गंगा प्रदूषित न करण्याचे महत्त्व ! ४८
३. मंदिरसंस्कृतीचे संवर्धन ४९
४. हिंदु धर्मरक्षणासाठी हे करा ! ५२

**प्रकरण ४. अध्यात्मशास्त्र आणि साधना यांविषयीचे विचार ५४**
१. अध्यात्मशास्त्राचे श्रेष्ठत्व ५४
* कुठे विज्ञानातील खुजे संशोधन, तर कुठे सर्वोच्च पातळीचे अध्यात्मातील संशोधन ! ५५
२. साधना ५६
* विविध साधनामार्ग * गुरुकृपायोगानुसार साधना ५७
* क्षात्रधर्म साधना (सत्ववृत्तींचे रक्षण आणि दुष्पवृत्तींचे निर्मूलन यांसाठी करावयाची साधना) ६२

# मनोगत

थोरपुरुषांचे विचार त्या त्या काळातील समाजाला दिशादर्शक असतात. किंबहुना थोरपुरुषांच्या विचारांनुसार समाज मार्गक्रमण करत असतो. हे थोरपुरुष जर अध्यात्मातील अधिकारी, म्हणजेच संत, गुरु किंवा परात्पर गुरु असतील, तर त्यांनी सांगितलेले विचार हे धर्मग्रंथातील आध्यात्मिक ज्ञानासारखे चिरंतन असतात. सनातन सस्ंथेचे संस्थापक प.पू. डॉ. जयंत आठवले हे परात्पर गुरु असलेले संत आहे. त्यांनी संकलित केलेली अध्यात्म, साधना, आचारपालन इत्यादी विषयांवरील ग्रंथसंपदा ही अध्यात्माच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त, तर कुठल्याही योगमार्गानुसार साधना करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक आहे. वर्ष १९९८ पासून ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांच्या माध्यमातून प.पू. डॉ. आठवले समाज, राष्ट्र आणि धर्म यांच्याशी संबंधित धगधगते विचारही मांडत आहेत. या विचारांत राष्ट्रोत्थान आणि धर्मसस्ंथापना यांचे बीज रोवलेले आहे. हे विचार राष्ट्रप्रेमी आणि धमप्रेमी यांच्यासाठी दिशादर्शक आहेत, तसेच सर्वसामान्य जन्महिदूंनाही जागृत करणारे आहे.  या ग्रंथात निवडलेले विचार हे प्रातिनिधिक आहेत. त्यांनी लिहिलेल्या एकूण विचारांचा विचार केल्यास ते हिमनगाचे टोक ठरतील. त्यानी अद्यापपर्यंत लिहिलेले विविध क्षेत्रांच्या संदर्भातील त्यांचे संपूर्ण विचार एकत्र करायचे ठरवल्यास प्रत्येक क्षेत्राशी संबंधित स्वतंत्र ग्रंथ होईल. त्यांचे विचार काही जणांना प्रस्थापितांच्या विरोधात बंड करणारे किंवा क्रांतीकारी वाटतील; मात्र ते समाज, राष्ट्र, धर्म आणि संस्कृती यांच्या हितरक्षणासाठीच आहेत. या ग्रंथात निवडलेले परात्पर गुरु डाॅ. आठवले यांचे विचार सार्वकालिक असून ते सध्याच्या काळाला सवाधिक उपयुक्त आहेत.  भारतात धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्र स्थापन होण्यासाठी राष्ट्रप्रेमी अन् धर्मप्रेमी यांच्यात ब्राह्मतेज (साधनेचे बळ) आणि क्षात्रतेज वृद्धींगत होणे अत्यावश्यक आहेत. या दृष्टीने या ग्रंथातील परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज युक्त विचार प्रेरणादायी ठरतील. या विचारांतून स्फूर्ती घेऊन प्रत्येक हिंदू धार्मिकदृष्ट्या जागृत व्हावा आणि धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कृतीशील व्हावा, हीच ईश्वरचरणी प्रार्थना ! – **संकलक.**